शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा
जास्तीत जास्त वापर करण्याबाबत.

परिपत्रक : प्राधिकरण/ ४०/२०११, दि. ३/१२/२०११

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
क्र.प्राधि/राजभाषा/२०११/८८२३/प्र.१५, दि. 3 DEC 2011

संदर्भ : १. सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.मभावा १०८०/प्र.५४/२०, दि.२८ मे, १९८२.
२. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.मभावा १०८६/४३४/ प्र.क्र.१६१/ ८६/ वीस-ब, दि.१८ जुलै, १९८६.
३. प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.प्राधि/राजभाषा/२०१०/३३/प्र.१५, दि.२/१/२०१०

सामान्य प्रशासन विभागाचे संदर्भ १ व २ व प्राधिकरणाचे परिपत्रक क्र.३ अन्वये यापूर्वी कळवून देखील कार्यालयीन दैनंदिन कामकाजात मराठीचा वापर कटाक्षाने केल्याचे दिसून येत नाही. तसेच संदर्भाधीन परिपत्रकांची अंमलबजावणी केली जात नसल्याचे आढळते. यास्तव पुन्हा पुढीलप्रमाणे निदर्शनास आणण्यात येत आहे.

सामान्य प्रशासन विभागाचे संदर्भ १ व २ रोजीच्या परिपत्रक / शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ व त्याखाली करण्यात आलेल्या नियमानुसार काही वर्जित प्रयोजने वगळता शासन व्यवहारात मराठीचा वापर करणे शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावर बंधनकारक आहे, असे आदेश शासनाने वेळोवेळी दिलेले आहेत. एवढेच नव्हे तर वर्जित प्रयोजनात न मोडणाऱ्या कामकाजातही संयुक्तिक कारण नसताना राजभाषा मराठीचा वापर करण्याच्या संदर्भात जे अधिकारी / कर्मचारी टाळाटाळ करतील त्यांच्या गोपनीय अभिलेखात नोंद घेण्यात यावी व वारंवार समज देऊनही जे अधिकारी वा कर्मचारी नियमानुसार राजभाषेचा वापर करणार नाहीत त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करावी असेही आदेश दिलेले आहेत. तसेच राजभाषा मराठीचा वापर करण्यासंदर्भातील शासन आदेशाचे, शासकीय कार्यालये व विभाग प्रमुख यांनी काटेकोरपणे पालन न केल्यास विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना जबाबदार धरण्यात येईल. अशा सूचना वरील शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. ~~सदर शासन परिपत्रक / शासन निर्णयाची प्रत सोबत जोडण्यात आली आहे.~~

........कृ.मा.प.

वरील शासनाच्या सूचना असतानाही शासन व्यवहारात मराठीचा जास्तीत जास्त वापर होत नसल्याबाबतच्या बातम्या वर्तमानपत्रातून प्रसिध्द झाल्या आहेत. त्यामुळे शासनाच्या मराठीकरणाच्या महत्वाच्या धोरणास बाधा आणणारी बाब असल्याने या अंमलबजावणीच्या कार्यवाहीत हलगर्जीपणा दाखवून टाळाटाळ करणाऱ्या संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांस जबाबदार धरण्यात येऊन कार्यवाही करण्याबाबत प्राधिकरणास भाग पडेल, याची जाणीव सर्व अधिकारी / कर्मचारी यांना द्यावी.

प्राधिकरण व विभागीय मंडळातील अधिकारी / कर्मचारी यांनी कार्यालयात सर्वसाधारण जनतेशी करण्यात येणारा पत्रव्यवहार, आदेश, परिपत्रके इतर कामेही मराठीतूनच करावी, याची दक्षता घ्यावी. अन्यथा शासन निर्णय क्र. मभावा १०८६/४३४/ प्र.क्र.१६१/८६/ वीस-ब, दि.१८ जुलै, १९८६ नुसार प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल, याचीही संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदरहू परिपत्रक सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे निदर्शनास आणून सदर परिपत्रकावर त्यांच्या स्वाक्षऱ्या घ्याव्यात.

(शिवाजी दिवेकर)
सचिव / प्राधिकरण.

ISSUED 03/12/99

प्रति,

१. मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/ प्रा.
२. मुख्य अभियंता- १/२/प्रा.
३. विधी सल्लागार/ प्रा.
४. वित्त नियंत्रक/ प्रा.
५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी/ प्रा.
६. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/ प्रा.
७. चौकशी अधिकारी/ प्रा.
८. सक्षम प्राधिकारी, १/२/३/प्रा.
९. मुख्य जनसंपर्क अधिकारी/ प्रा.
११. मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ / मुं.इ.दु.व पु.मं./ मुं.ग.व.सु.मं./
कोकण/ पुणे / नाशिक / नागपूर / औरंगाबाद / अमरावती.
१२. सहमुख्य अधिकारी, मुंबई मंडळ / मुं.इ.दु.व पु.मंडळ

.........३..

१३. उपमुख्य अभियंता (स्थापत्य)/ मुंबई मंडळ, परिमंडळ १/२/३/४,/दु.व पु.मंडळ,
नियोजन/ एस.आर.डी./मुंबई मंडळ,
दक्षता व गुणनियंत्रण कक्ष/प्रा., संगणक कक्ष/ प्रा., जेएनएनयुआरएम/ प्रा.

१४. वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ व रचनाकार/ मुं.मं.

१५.कार्यकारीअभियंता(विद्युत),(दुरुस्ती),(घाटकोपर)/(वांद्रे)/मुं.मं.१,२, ३/प्रा.

१६. कार्यकारी अभियंता (विद्युत)/ प्रा.

१७. कार्यकारी अभियंता (पूर्व), (पश्चिम), (शहर), ग.व.सुं.मंडळ.

१८. चौकशी अधिकारी/ प्रा.

१९. निवासी लेखापरिक्षा अधिकारी/प्रा.

२०. मुख्य लेखाधिकारी/ मुंबई मंडळ / मुं.इ.दु.व पु.मं./ मुं.ग.व.सु.मं./
कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / नागपूर / अमरावती मंडळ.

२१. सहाय्यक लेखाधिकारी, उत्तर / दक्षिण / मध्य / आर.आर.

२२. उपमुख्य अधिकारी (मि.व्य.१/२) (डब्ल्यू)/ मुं.मं./संगा/पुगा, संचालक पणन / मुं.मं.

२३. सहसंचालक, शि.पु.प्रा.लि.

२४. कार्यकारी अभियंता (ए) (बी) (सी-१/२, सी-३/४) (डी-१/२) (ई १/२)
फ/ग (दक्षिण), फ/ग (उत्तर)

२५. मिळकत व्यवस्थापक -१,२,३,४,५/डब्ल्यू /संगा/पुगा/कोकण मंडळ

**प्रत** : प्रशासकीय अधिकारी/ प्रा./ मुंबई मंडळ/ दु.व पु. मंडळ

**प्रत माहितीसाठी.**

१. मा.उपाध्यक्ष/ प्रा. यांचे स्वीय सहाय्यक.

२. अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना.

३. प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना.

४. अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन म्हाडा, मुंबई.

**प्रत** :- प्रशासन-५/६/७/८/९/१०/११/१२/१३/१४/१५/१६/१७/ प्राधिकरण.